# मुंबई विद्यापीठ

**निवडणूक विभाग**

**क्र.नि.वि./आयसीडी/२०१८—१९/२४८/२०१८**

परिपत्रक :—

विद्यापीठाचे अधिसभा सदस्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३०(४)(च)(f), (छ)(g), (ज)(h) व (झ)(i) नुसार अधिसभेचे सदस्य असलेल्या प्राचार्य, अध्यापक व विद्यापीठ अध्यापक, व्यवस्थापन प्रतिनिधी व नोंदणीकृत पदवीधर यांचेमधून प्रत्येकी दोन सदस्य अधिसभेच्या बैठकीत व्यवस्थापन परिषदेवर सदस्य म्हणून निवडून देण्याकरीताची निवडणूक अधिसुचना क्रमांक नि.वि./आयसीडी/२०१७-१८/२३३/२०१८ शनिवार, दिनांक ३० जून, २०१८ रोजी पारीत करण्यात आली असून व्यवस्थापन परिषदेवरील सदस्यत्वाकरीता उमेदवारी अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक मंगळवार, १० जुलै, २०१८ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत आहे.

अधिसुचना क्रमांक नि.वि./आयसीडी/२०१७-१८/२३३/२०१८ दिनांक ३० जून, २०१८ बाबत कळविण्यात येते की, मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयांमध्ये अतिवृष्टी होत असल्याने व मंगळवार, दिनांक १० जुलै, २०१८ रोजी अतिवृष्टीमुळे जर दळणवळण सेवा बंद असेल तर कोणत्याही उमेदवाराचे नामनिर्देशन अर्ज स्विकारण्यास अडचण येऊ नये म्हणून तसेच इच्छुक उमेदवारास अर्ज दिलेल्या मुदतीत विद्यापीठाकडे व्यक्तीशः सादर करता येत नसेल तसेच उमेदवारास प्रत्यक्षात येऊन भरणे शक्य नसल्यास त्यांना सुचित करण्यात येते की, **विहित नमुन्यातील नामनिर्देशन अर्ज विद्यापीठाच्या www.mu.ac.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करून, पुर्णपणे भरून arelection@election.mu.ac.in या ईमेलवर दिनांक १० जुलै, २०१८ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत निवडणूक विभागाकडे पाठवावेत.** त्यानंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

पुढे असेही सुचित करण्यात येते की, उमेदवारांने ईमेलवर स्कॅन करून पाठविलेल्या अर्जाची मुख्य प्रत (Original) दिनांक १२ जुलै, २०१८ रोजी पर्यंत निवडणूक विभाग, कक्ष क्रमांक ११०, पहिला मजला, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२. येथे जमा करावी. अन्यथा आपला अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

स्वाक्षरीत/—

मुंबई — ४०० ०३२
दिनांक — ०९ जुलै, २०१८.

डॉ. दिनेश कांबळे
प्रभारी कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी